FORM-1 A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: दा.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No.: ३८, Year: २०१८, दिनांक Date: ०५/१२/२०१८

2. (i) अधिनियम Act: अत्याचार प्र. अधि. १९८९, कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ..............., कलमे Sections ...............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...............

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ..........., तारीख पासून Date from: ३०/१०/२०१८, Time ..........., तारीख पर्यंत Date to: ०५/१२/२०१८, Time: १५:४३ वा.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date: ०४/११/२०१८, वेळ Time ...........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: २८/१८, तारीख Date: ०५/१२/२०१८, वेळ Time: १६:०० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : ..........., लेखी/तोंडी Written/Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S.: उत्तरेस २५ कि.मी., चौकी/बीट/दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ...........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: कामसेन्स इन्व्हेस्टमेंट गोडाऊन, कोंडी विलेज कॉलनी, एव्हरशाईन नगर, मालाड (प.), मुंबई
   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest identifiable Place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: रोहित जायसवाल (b) वडीलाचे/पतीचे नाव Father's /Husband's Name: रामप्रताप जायसवाल
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: २५ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ८४५२०८९९४२
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..........., (f) व्यवसाय Occupation: हातगाडी-फेरी फळविक्री
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता Address: रूम नं. ०८, साई आशीर्वाद चाळ, जिजामाता नगर, कुरार व्हिलेज, मालाड (पू.), मुंबई ९७
   Ward, House/Name No., Phone/M. No., Pan No., Card No.
   रस्त्याचे नाव Road ..........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., पो. स्टे. P. Stn. ...........
   तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   हरिलाल परमार (पूर्ण नाव, पत्ता माहित नाही), वय अंदाजे ५५ वर्षे

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक ०५/१२/२०१९

रोहित रामप्रताप जायसवाल, वय— २५ वर्षे, धंदा— हातगाडीवर फळे विक्रीचा व्यवसाय, रा.ठी.— रूम नं. ०८, साई श्रध्दा चाळ, जिजामाता नगर, कुरार व्हिलेज, मालाड (पु.), मुंबई ९७. मो. नं. ८४५२०८९९४२.

————०००० ————

मी वरिल प्रमाणे असुन मी वर नमुद ठिकाणी मागील ०५ वर्षापासुन माझा लहान भाऊ नामे रितीक, वय १८ वर्षे याचे सोबत वास्तव्यास आहे. मी मुळचा प्रतापगढ, उत्तरप्रदेश येथील आहे. मी मालाड (पुर्व) भागातील भिमनगर, दामूनगर, शिवाजी नगर, आप्पा पाडा या विभागामध्ये फिरत्या हातगाडीवर फळे विक्रीचा धंदा करतो. माझेकडे एकुण ०८ हातगाडया असून त्यावर गावाकडील मुलांना कामावर ठेवून त्यांच्या मार्फतीने धंदा करतो. मालाड येथील बी.एम.सी. वार्ड येथील ऑफिसर श्री. हरिलाल परमार ज्यांना आम्ही फेरीवाले पाटील साहेब या नावाने ओळखतो ते महीन्यातून एक दोन वेळा हातगाडया उचलून नेतात व पैसे घेतल्यावर हातगाडया सोडून देतात. हरिलाल परमार/पाटील साहेबांनी माझे हातगाडयांवर कारवाई न करण्याकरीता महिना १२,०००/— रू. च्या लाचेची मागणी केली. परंतू सदरची लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ०४/११/२०१९ रोजी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात तक्रार देण्याकरीता आलो. पोलीस निरीक्षक सचिन पाटील यांनी माझी स्वहस्ताक्षरात सविस्तर लेखी तक्रार लिहून घेतली त्यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त आबासाहेब पाटील हे देखील हजर होते.

दिनांक ०५/११/२०१९ रोजी ला.प्र.वि. कार्यालय येथे दोन शासकीय पंचासमक्ष माझे तक्रारीची पडताळणी करण्यात आली व त्यानंतर पो.नि. सचिन पाटील यांनी त्यांचे कारवाई पथक, मी व दोन सरकारी पंच यांचेसह पडताळणी कारवाई केली. पडताळणीसाठी जातेवेळी माझे बनियनला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर लावलेला होता व पंच क्र. ०१ हे सोबत होते. त्यावेळी मी लोकसेवक हरिलाल परमार यांची भेट घेतली त्यावेळी लोकसेवक श्री. परमार यांनी माझेकडे रू. ८,०००/— च्या लाचेची मागणी केली परंतू तडजोडीअंती ७,०००/— स्विकारण्यास मान्यता दिली. सदर संभांषणादरम्यान दुसऱ्या दिवशी बारा—एक वाजता लोकसेवक परमार यांना मी फोन केल्यावर ते भेटणार व रू. ७,०००/— स्विकारणार असे ठरले होते. दिनांक ०५/११/२०१९ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान माझे व लोकसेवक श्री. परमार यांच्यात झालेले सदरचे संभाषण हे डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले आहे.

त्यानंतर दिनांक ०६/११/२०१९ रोजी सरकारी पंच, पोलीस निरीक्षक पाटील व सापळा पथक असे आम्ही मालाड पश्चिम येथील लोकसेवकाच्या कार्यालयाजवळ जावुन लोकसेवकास माझा मोबाईल क्रमांकावरून फोन करून मी मालाड वेस्ट येथे आलो असल्याचे सांगुन ते कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी ते बाहेर असल्याचे सांगुन उदया फोन करतील असे सांगीतल्याने त्यादिवशी सापळा कारवाई होऊ शकली नाही.

दिनांक ०७/११/२०१९ रोजी मी, पंच व सापळा पथक हे मालाड पश्चिम येथे लोकसेवकाच्या कार्यालयाजवळ आलो. लोकसेवकाचा फोन न आल्याने मी व सरकारी पंच क्र. ०१ असे आम्ही लोकसेवकाच्या कार्यालयामध्ये गेलो, परंतु लोकसेवक कार्यालयामध्ये नसल्याने भेट होवु शकली नाही. त्यानंतर थोडया वेळाने लोकसेवकास त्यांच्या मोबाईलवर

Scanned with OKEN Scanner

कॉल केला असता लोकसेवकाने ते दोन दिवस बाहेर असल्याचे सांगुन आल्यावर समोरून स्वत: फोन करतील असे सांगीतले त्यामुळे त्या दिवशीची कारवाई स्थगीत करण्यात आली.

त्यानंतर गुरूवार दिनांक २१/११/२०१९ रोजी लोकसेवकाच्या कार्यालयाकडून माझे दोन हातगाडयांवर कारवाई करून उचलून नेल्याने त्या सोडविण्याकरीता मी सोमवार दिनांक २५/११/२०१९ रोजी लोकसेवकाच्या कार्यालयात जावून लोकसेवकाची भेट घेणार असल्याबाबत शुक्रवार दिनांक २२/११/२०१९ रोजी पो.नि. पाटील यांना फोनवर संपर्क साधून कळविले होते. त्याप्रमाणे दिनांक २५/११/२०१९ रोजी मी, पंच व पडताळणी पथक हे मालाड पश्चिम येथे आलो. परंतू लोकसेवक हे त्यांच्या कार्यालयात नसल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यामुळे मी त्यांना त्यांचा मोबाईल क्र. ७७१००३०३२० यावर फोन केला असता त्यांनी मला लिबर्टी गार्डन येथील कार्यालयात पहिल्या माळयावर येण्यास सांगीतले. त्यानंतर लोकसेवकाने सांगीतलेल्या ठिकाणी जावून देखील लोकसेवकाशी भेट झाली नाही त्यानंतर लोकसेवकाने माझे फोन स्वीकारले नाही नंतर त्यांनी त्यांचा फोन बंद केल्याने त्या दिवशी देखील सापळा कारवाई होऊ शकली नाही. तद्नंतर आजअखेर लोकसेवक परमार यांनी पैसे स्विकारण्यासाठी माझ्याशी कोणताही संपर्क केला नाही. त्यामुळे लोकसेवक परमार हे लाचेची रक्कम स्विकारण्याची शक्यता नाही.

आज रोजी मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात लोकसेवक श्री. हरीलाल परमार, पी नॉर्थ वॉर्ड, बुहन्मुंबई महानगरपालिका यांचेविरुध्द फिर्याद देण्याकरीता आलो. तरी लोकसेवक श्री. हरीलाल परमार यांनी पडताळणी दरम्यान दिनांक ०५/११/२०१९ रोजी माझ्या हातगाडयांवर कारवाई न करण्यासाठी म्हणुन स्वत:करीता रू. ७,०००/— एवढया रक्कमेचा गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मी वाचुन पाहिला असता तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(सचिन पाटील)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

473

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ पडताळणी करुन दाखल
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी खालील आरोपी लोकसेवक श्री. हरिलाल परमार, पी-उत्तर वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालीका मालाड (प.), मुंबई यांनी फिर्यादी यांच्या हातगाड्यांवर कायदेशीर कारवाई न करण्याकरीता स्वत:साठी महिना रुपये ८,०००/- एवढ्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली. तडजोडीअंती रु. ७,०००/- एवढ्या रक्कमेचा गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला. म्हणुन भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. ..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

5.12.19

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name .......... सचिन ल. पाटील
पदनाम Rank .......... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ..........
Posting
Code No. of I. O. ..........

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner